# अंतिम हुकूमनामा.क्र.०२/२०१९ मधील निशाणी क्र.३९वरील आदेश
# (CNRNo.MHSI090001412019)

०१. अर्ज व त्यावरील सामनेवाला यांचा जबाब वाचला. उभय पक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद श्रवण केला.

०२. प्रकरणातील मुळ अर्जदार जयवंत श्रीकृष्ण कुळकर्णी हे दि.०९/०८/२०२१ रोजी मयत झाले असल्याने अर्जदारांनी ते मयताचे वारस असल्याने त्यांना अभिलेखावर घेण्यास विनंती केलेली आहे. दप्तरी दाखल असलेल्या मृत्यूप्रमाणपत्रावरुन मुळ अर्जदार जयवंत हे दि.०९/०८/२०२१ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. अर्जदारच्या कथनाप्रमाणे क्र.०१अ ते ०१क हेच मयताचे वारस आहेत. अर्जाचे स्वरुप बघता अर्जाचे कारण अबाधित राहत असल्याने व दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका २२ ची व्याप्ती लक्षात घेता अर्ज मंजूर करणे न्यायसंगत वाटते. परिणामी, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

## – आदेश –

०१. निशाणी क्र.३९ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
०२. अर्जदारांना मयत अर्जदाराचे वारस म्हणून अभिलेखावर समाविष्ट करुन व त्या अनुषंगाने दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.
०३. विहीत मुदतीत आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश आपोआप रद्द झाल्याचे समजावे.

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2023.02.10 11:47:58 +1000

स्थळ : देवगड (एस.बी.वाळके)
दिनांक : ०८/०२/२०२३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.